कृषि पुरस्कार व पीकस्पर्धा विजेत्या शेतकऱ्यांच्या बक्षिसाकरिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक-पुरस्कार-२०२६/प्र.क्र.८४/४-अे (ई-१७१३८०८)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक - २२ जून, २०२६.

**संदर्भ:-**

१) पीक स्पर्धा नियमावली पुस्तिका जानेवारी २००२

२) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. कृपु-२०२०/प्र.क्र.१२/४-अे, दि.१५ फेब्रुवारी, २०२१

३) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. पीकस्पर्धा-२०२२/प्र.क्र.११३/४-अे, दि.२० जुलै, २०२३

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात दरवर्षी शेती व शेतीपूरक क्षेत्रात अतिउल्लेखनिय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यास अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत शेती क्षेत्राशी संबंधित विविध पुरस्कार देण्यात येतात. तसेच, राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यांमध्ये वाढ होऊन त्यांच्याकडून आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळते. तसेच, त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण कृषि उत्पादनात मोलाची भर पडते, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीकस्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

सन २०२६-२७ या वर्षासाठी, सदर योजनेकरीता रु.१०००.०० लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे. सदर निधीस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. सन २०२६-२७ या वर्षामध्ये सन २०२३ व सन २०२४ करिता विविध कृषि पुरस्कार व रब्बी व खरीप हंगाम पीकस्पर्धा विजेत्या शेतकऱ्यांच्या बक्षिसाकरिता, रु.१०००.०० लाख (अक्षरी रु.दहा कोटी फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. सदर निधीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. विविध कृषि पुरस्कार व रब्बी व खरीप हंगाम पीकस्पर्धा विजेते शेतकऱ्यांना बक्षीस रक्कम अदा करण्याकरिता सदर निधी पुढील लेखाशीर्षाखालील अर्थसंकल्पीय तरतुदीतून खर्ची टाकावा:-

२४०१- पीक संवर्धन
१०९- विस्तार व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण
१०९ (०१)(०३) पीक स्पर्धा
५०- इतर जमा
(२४०१ ०७५३) विविध कृषि पुरस्कार व पीक स्पर्धा विजेते शेतकऱ्यांचा सत्कार

३. या शासन निर्णयान्वये सदर निधीचे कोषागारातून आहरण व वितरण करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियंत्रण अधिकारी, तसेच, आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्तर | नियंत्रण अधिकारी | आहरण व संवितरण आधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. |
| २ | विभाग स्तर | संबंधित विभागीय कृषी सहसंचालक | संबंधित विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी |
| ३ | जिल्हा स्तर | संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी |
| ४ | तालुका स्तर | तालुका कृषी अधिकारी | तालुका कृषी अधिकारी |

४. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा. तसेच, निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

५. या शासन निर्णयान्वये वितरीत निधी खर्च करताना, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या, तसेच, नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित अटी व शर्तीचे, तसेच, वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

६. वितरीत केलेला निधी तातडीने खर्च करावा व वितरीत केलेला निधी बँक खात्यावर पडून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. सदर पुरस्काराची अनुज्ञेय रक्कम संबंधित शेतकरी/संस्था यांना RTGS/ECS प्रणाली द्वारे त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात यावी. विभागून देण्यात आलेल्या पुरस्काराच्या बाबतीत पुरस्कारासाठीची रक्कम विभागून देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२२१८११४६९२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUCHITA
RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.06.22 18:13:22 +05'30'

**( रुचिता पिंपळे )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण)मंत्रालय, मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (राउशु, क्रिडा, अल्पसंख्यांक) मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई
६. मा. मंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (फलोत्पादन), मंत्रालय, मुंबई
८.मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१२. उप सचिव (४-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. उप सचिव (प्रशा-१), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
१५. सर्व विभागीय कृषि सह संचालक.
१६. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.
१७. महालेखाकार (स्थानिय निकाय लेखा परीक्षा व लेखा), मुंबई
१८. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१९. वित्त विभाग (कार्यासन व्यय-१/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
२०. निवडनस्ती, ४-अे.